पत्र

जा.क्र./फलो-६/व्हीआयआयडीपी/सु.सिं./४७३/१४
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर
पुणे-४११ ००५ दिनांक ०१/०७/२०१४

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक**
अमरावती/नागपूर
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**
बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती , यवतमाळ,
नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली

**विषयः- विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम(VIIDP)**
**सुक्ष्म सिंचन सन २०१४-१५ मार्गदर्शक सूचना बद्द्ल**

**संदर्भ** - १) केंद्र शासनाच्या इंग्रजी मार्गदर्शक सूचना D.O.No.13-1/2011/M&T(I&P)/Pt1 नवी दिल्ली दिनांक २० एप्रिल २०१२
२) कृषि आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना जा.क्र. मृदस/विससिंविका/४०३२/२०१३ पुणे दिनांक १७ ऑक्टोबर २०१३
३) महाराष्ट्र शासनाचे शुध्दीपत्रक क्रमांक : विविका-२०१२/प्र.क्र.०३/जल-१ मंत्रालय मुंबई दिनांक २६ नोव्हेंबर २०१३

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम ही योजना २०१२-१३ पासून अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यात व नागपूर विभागातील नागपूर, वर्धा व चंद्रपूर या तीन जिल्ह्यात असे विदर्भातील एकूण ८ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत आहे. या वर्षा पासून नागपूर विभागातील उर्वरित गोंदिया, भंडारा व गडचिरोली जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

## प्रस्तावना –

विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म सिंचन या उपयोजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या दिनांक २० एप्रिल २०१२ आणि राज्य शासनाने निर्गमीत केलेल्या २८ जून २०१२ च्या मार्गदर्शक सूचनानुसार विदर्भातील सन २०१२-१३ मध्ये बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये सुरू केली. सन २०१३-१४ मध्ये देखील या धर्तीवर योजना राबविण्यात आली.

राज्य शासनाचे महाराष्ट्र शासनाचे शुध्दीपत्रक क्रमांक : विविका-२०१२/प्र.क्र.०३/जल-१ मंत्रालय मुंबई दिनांक २६ नोव्हेंबर २०१३ अन्वये या योजनेमध्ये भंडारा, गोंदिया व गडचिरोली या तीन जिल्ह्यांचा देखील समावेश केला आहे.

## योजनेचा उद्देश –

अ) विदर्भ विभागातील जास्तीत जास्त क्षेत्र सुक्ष्मसिंचनाखाली आणणे जेणे करून पाण्याची बचत होऊन पिक उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते.
ब) सुक्ष्म सिंचनामुळे पिकांना योग्य प्रमाणात, वेळेवर व नियंत्रीत पाणी उपलध होते, जेणे करून पिक उत्पादनात वाढ होऊन पर्यायांने शेतक-यांच्या उत्पन्नात भर पडते.
क) सुक्ष्म सिंचनाद्वारे विद्राव्य खते देखील देता येतात जेणे करून शेतक-यांचा वेळ व परिश्रम वाचतो व खताची कार्यक्षमता वाढून उत्पादनामध्ये वाढ होते.

## कार्यक्रमाची अंमलबजावणी –

१) सुक्ष्म सिंचन पद्धतीसाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान सन २०१०-११ व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाच्या सन २०१२-१३ च्या मार्गदर्शक सूचना लागु राहतील तसेच केंद्र शासनाने निर्गमीत केलेल्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान कार्यक्रमासाठी निर्गमीत केलेल्या सन २०१४-१५ साठी इंग्रजी मार्गदर्शक सूचना वापरावयाच्या आहेत. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमासाठी अनुदानाचे प्रमाण खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र | बाब | परिमाण | अर्थसहाय्याचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ठिबक सिंचन पद्धतीकरिता अर्थसहाय्य (२ हेक्टर क्षेत्रा पर्यंत) | हेक्टर | **इतर शेतकरी** - एकूण किंमतीच्या ५० टक्के रु.३८०००/- पर्यंत<br>**अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी** -<br>एकूण किंमतीच्या ७५ टक्के रु. ५७०००/- पर्यंत |
| २ | तुषार सिंचन पद्धतीकरिता अर्थसहाय्य (२ हेक्टर क्षेत्रा पर्यंत) | हेक्टर | **इतर शेतकरी** - एकूण किंमतीच्या ५० टक्के रु.१५०००/- पर्यंत<br>**अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी** -<br>एकूण किंमतीच्या ७५ टक्के रु. २२०००/- पर्यंत |

२) सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी संगणक प्रणालीचा (ई-ठिबक) अवलंब करण्यात यावा. ऑनलाईन अर्ज सादर करताना शेतक-यांनी कृषि विभागाची वेबसाईट www.mahaethibak.gov.in संकेतस्थळावर जाऊन processing करावयाचे आहे.

**सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी वेळापत्रक.**

| अ.क्र | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारे अधिकारी | कार्यवाहीसाठी कालावधी |
|---|---|---|---|
| १ | अर्ज प्राप्त झाल्यावर पुर्व संमती देणे | तालुका कृषि अधिकारी | अर्ज प्राप्त झाल्यापासून १ आठवड्याच्या आत. |
| २ | संच बसविणे | शेतकरी/वितरक/उत्पादक | पुर्व संमती मिळाल्यानंतर १ महिन्यात |
| ३ | बिल इनवाईस | तालुका कृषि अधिकारी | संच बसविल्यानंतर १ आठवड्याच्या आत. |
| ४ | मोका तपासणी साठी अर्ज पाठविणे | तालुका कृषि अधिकारी | बिल इनवाईस झालेल्या दिवसी. |
| ५ | मोका तपासणी करणे | मंडळ कृषि अधिकारी | बिल इनवाईस झाल्यापासन १ आठवड्याच्या आत. |
| ६ | मोका तपासणीचा अहवाल तालुका कृषि अधिकारी यांना सादर करणे | मंडळ कृषि अधिकारी | मोका तपासणी पूर्ण झाल्यापासून ३ दिवसाच्या आत. |
| ७ | अनुदानासाठी शिफ़ारस पत्र उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करणे. | तालुका कृषि अधिकारी | मोका तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यापासून ३ दिवसाच्या आत. |
| ८ | अनुदानासाठी शिफ़ारस पत्र तपासून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करणे. | उपविभागीय कृषि अधिकारी | अनुदानासाठी शिफ़ारस पत्र प्राप्त झाल्या पासून ३ दिवसाच्या आत |
| ९ | शेतक-याचे अनुदान आरटीजीएस द्वारे शेतक-याच्या खाती जमा करणे | जिल्हा अधिक्षक क-षि अधिकारी | अनुदानासाठी शिफ़ारस पत्र प्राप्त झाल्या पासून १ आठवड्याच्या आत ही कार्यवाही पूर्ण करणे |

सदरचे अर्ज ऑनलाईन प्रणाली व्दारे संबंधीत तालुका कृषि अधिका-यांकडे अनुदानाकरीता सादर होईल. अर्जदाराने अर्जासोबत ज्या क्षेत्रात संच बसवावयाचा आहे त्या क्षेत्राचा ७/१२ व ८-अ उतारा जोडणे आवश्यक आहे. तदनंतर शेतक-यानी ठिबक/तुषार संच बसविण्यासाठी विहीत प्रपत्रातील अर्ज तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील. सदर अर्जास पुर्व संमती मिळाल्यावर शेतकरी संच बसविल.सदर संचाची मोका तपासणी मंडळ कृषि अधिकारी मार्फ़त केली जाईल. या तपासणी मध्ये संच पात्र ठरल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मार्फ़त अनुदानाची रक्कम शेतक-याचे बॅक खात्यावर (चेक/आरटीजीएस द्वारे) जमा करणेसाठी पात्र राहील.

३) सुक्ष्म सिंचन योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषि आयुक्तालयाचे जा.क्र.कृआ/फ़लो-६/प्र.क्र.४/मासुबदल/४६३(अ)/२०१३ दिनांक २८.६.२०१३ अनुसार कार्यवाही करावी.

४) सुक्ष्म सिंचन योजना परिणामकारक अंमलबजावणी साठी वितरकांना साठा नोंदवही ठेवणे बंधनकारक करावे व त्याची कंपनी प्रतिनिधी व अधिका-याकडून नियमित तपासणी करुन घावी. अनियमितता/गैरप्रकार आढळून आल्यास कंपनी/वितरकावर त्वरीत कारवाई करावी.

**संचालक फ़लोत्पादन**
**कृषि आयुक्तालय**
**महाराष्ट्र राज्य,पुणे - ५**

**प्रत** - संचालक , मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय पुणे-१ यांना समादराने अग्रेषित.

## विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम सन २०१४-१५
## सुक्ष्म सिंचन योजना (भौतिक हे., आर्थिक रु.लाख)

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | ठिबक | | तुषार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | अमरावती | बुलढाणा | २२६९ | १२९३.०० | ११३१ | २४९.०० | ३४०० | १५४२.०० |
| २ | | अकोला | १४७२ | ८३९.०० | ७३३ | १६१.०० | २२०५ | १०००.०० |
| ३ | | वाशिम | १२८० | ७३०.०० | ६३४ | १३९.०० | १९१४ | ८६९.०० |
| ४ | | अमरावती | २५४६ | १४५१.०० | १२७१ | २८०.०० | ३८१७ | १७३१.०० |
| ५ | | यवतमाळ | २८६५ | १६३३.०० | १४२७ | ३१४.०० | ४२९२ | १९४७.०० |
| **अमरावती विभाग एकुण** | | | **१०४३२** | **५९४६.००** | **५१९६** | **११४३.००** | **१५६२८** | **७०८९.००** |
| ६ | नागपुर | वर्धा | १२३० | ७०१.०० | ६१२ | १३५.०० | १८४२ | ८३६.०० |
| ७ | | नागपुर | १२४० | ७०६.६७ | ६०९ | १३४.०० | १८४९ | ८४०.६७ |
| ८ | | चंद्रपुर | ७६५ | ४३६.०० | ३९१ | ८६.०० | ११५६ | ५२२.०० |
| ९ | | भंडारा | ४६२ | २६३.११ | २३२ | ५१.०० | ६९३ | ३१४.११ |
| १० | | गोंदिया | ४६२ | २६३.११ | २३२ | ५१.०० | ६९३ | ३१४.११ |
| ११ | | गडचिरोली | ४६२ | २६३.११ | २३२ | ५१.०० | ६९३ | ३१४.११ |
| **नागपूर विभाग एकुण** | | | **४६२०** | **२६३३.००** | **२३०७** | **५०८.००** | **६९२७** | **३१४१.००** |
| **महाराष्ट्र राज्य एकूण** | | | **१५०५२** | **८५७९.००** | **७५०३** | **१६५१.००** | **२२५५५** | **१०२३०.००** |